## प्रकरण चौथे

## अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाटयातील विशेष

### प्रस्तावना :

तमाशाचा आधुनिक काळातील एक आविष्कार म्हणून अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाटयाचा विचार करता येईल. अण्णाभाऊंनी जी लोकनाटये लिहिली आहेत ती वैशिष्टयपूर्ण स्वरूपाची आहेत. त्यामुळे त्याचे विशेष ध्यानात घेता येईल. लोकनाटय हे सामान्य माणसाच्या परिचयाचे आहे. त्यांच्या जीवनामध्ये घडणा-या घडामोडींचे यथार्थ प्रतिबिंब या लोकनाटया-मधून अविष्कृत होत असल्यामुळे व त्याचा परिणाम सामान्य जनांच्या मनावर पटकन होत असल्यामुळे ही लोकनाटये प्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे करण्यात समर्थ ठरलेली आहेत. समकालीन अशा सामाजिक परिवर्तनाच्या युगातील विचार-क्रांतीचे आणि समाजस्थितीचे चित्रण करण्याच्या भूमिकेतूनच लोकनाटयाचा उदय झालेला दिसतो.

त्यादृष्टीने अण्णाभाऊंच्या लोकनाटयाचा विचार करता अण्णाभाऊंनी पारंपरिक तमाशातील श्रृंगाराला पूर्णता फाटा दिलेला दिसतो. परंतु केवळ उपदेशाचे डोस पाजणारी निरस, कृत्रीम लोकनाटये त्यांनी लिहिलेली नाहीत. तर श्रृंगाराची जागा विनोदाच्या फुलो-याने फुलवून आपली लोकनाटये अधिक सकस बनविलेली दिसतात. अण्णाभाऊंची लोकनाटये विलक्षण लोकप्रिय झाली याचे कारण मराठी........

जनतेला रिझवतील आणि प्रबोधनही घडवील असे तंत्र अण्णाभाऊंना अवगत होते. त्यामुळेच त्यांची लोकनाटये जनतेला अधिक जिव्हाळयाची वाटतात.

अण्णाभाऊंनी पारंपरिक तमाशातील काही वैशिष्टये आत्मसात करुनच आपली लोकनाटये निर्माण केलेली दिसतात. त्यामुळे लोकनाटया-च्या घटकांच्या बाबतीत विचार करता अण्णाभाऊंनी आपल्या दृष्टि-कोणानुसार लोकनाटयाचे नाटयतंत्र निश्चित केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या लोकनाटयाचे स्वरुप हे अधिक लवचिक बनलेले दिसते. त्यादृष्टीने अण्णा-भाऊंच्या लोकनाटयातील वाड्.मयीन विशेषांचा अर्थात लोकनाटयातील घटक संघर्ष, स्वभावचित्रण, प्रसंगनिर्मिती, संवाद आणि विनोद या संबंधीची सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात करण्याचा हेतू आहे.

## १. अण्णाभाऊंच्या लोकनाटय रचनेचे स्वरुप

" लोकनाटय " म्हणजे लोकांच्या जीवनाला त्यांच्या आशा-आकांक्षाना लोकभाषेतच उद्‌गार दिलेला असतो. म्हणून त्यास लोकनाटय असे म्हणतात. त्यादृष्टीने पहाता " भारतीय रंगभूमी " या ग्रंथात " लोकनाटय " या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे आढळते. "लोकांनी लोकांसाठी जी रंगभूमी निर्माण केली ते लोकनाटय होय. त्यांचे अनुभव, जीवन पध्दती व त्यांचे जीवनमान यात बदल घडून आला की त्याप्रमाणे लोकनाटयातही बदल घडून येणारच." [१]

अण्णाभाऊंच्या लोकनाटय संदर्भात वि. स. जोग लिहितात, " लोकनाटय हया नवीन नाटयप्रकाराची देणगी अण्णाभाऊ साठे यांनीच मराठी नाटयवाड्.मयाला दिली ." [२] तेव्हा त्यांच्या लोकनाटय रचनेचा विचार करता त्यांनी लोकनाटयाची नवी परंपरा निर्माण करताना पारंपरिक तमाशात गंभीर आणि रंजक अशा दोनप्रकारची वैशिष्टये असणारे वग असतात. त्यापैकी गंभीर स्वरुपाच्या वगातील

वैशिष्ट्यांचा उपयोग करुन अण्णाभाऊ साठे यानी लोकनाट्ये लिहिली आहेत. पारंपरिक तमाशात गणाच्या लावणीत गणपतीची स्तुती केलेली असते. अण्णाभाऊ मात्र लोकनाटयाची सुरुवात करताना गणेशावंदनाऐवजी मातृभूमी, राष्ट्रवीर, देशभक्त, हुतात्मे यांना वंदन करुन त्यांच्याकडूनच आशीर्वाद मागितलेला दिसतो. उदाहरणार्थ " पेंग्याचे लग्न " या लोकनाटयामध्ये गणाची सुरवात पुढीलप्रमाणे दिसते.

"प्रथम मायभूच्या चरणा
छत्रपती शिवबा चरणा
स्मरोनी गातो कवना ।। धृ ।।
...............
आठवून मनी ही शुभनामे करुनिया स्तवना
आशीर्वाद मागतो आम्ही गावया कवना
सभापती आणि सुजना
कलावंत आणि रसिकांना
स्फूर्ति द्यावी हीच प्रार्थना "[3]

असे गणाचे स्वरुप दिसते. म्हणजेच पारंपरिक तमाशात गणेशाला किंवा अनेक देवदेवताना आवाहन करण्याची जी पध्दत होती. तिला नकार दिला. व देवदेवतांच्यापेक्षाही स्वतःच्या मातृभूमीला ते अधिक महत्व देताना दिसतात. याठिकाणी प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये असणा-या ईश्वर कल्पनाना फाटा दिला आहे. व समकालीन विचाराशी समरस होऊन नवा वैचारिक प्रवाह अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटया-मधून अविष्कृत केलेला दिसतो.

पारंपरिक तमाशात गणानंतर येते ती " गौळण". पण अण्णा-भाऊंनी मात्र या गौळणीला वगळले. व त्याठिकाणी " म्हणणी-" ची निर्मिती केलेली दिसते. " म्हणणी" म्हणजे प्रवेश परिचयाचे काव्यात्म कथासूत्र होय. हे काव्यात्म कथासूत्र पद्यरुप असते. व त्या

कवनातून कथानकाचा परिचय करून दिला जातो " पेंग्याचे लग्न" या लोकनाटयात "म्हणणी" पुढीलप्रमाणे आढळते.

" रत्नागिरी जिल्हयांत राजूरी नामे गावात ।
प्रकार घडला मोठा मजेशीर तो ऐका शांत ।।
गावकरानं हिंमत केली घेऊन जोरांत ।
पैज मारीली लगीन पेंग्याचं करतो दारांत ।
नवरी पाहिली तिथहो धरली तयारी झाली ।।
परी पेंग्याच्या त्या लग्नाला नाना विघ्नं आली ।।" [४]

अशा पध्दतीने कथानकाच्या सुरूवातीला " म्हणणी" म्हणून कथानकाचा उल्लेख श्रोत्यांना ऐकविला जातो. आणि त्यामधून पुढे काय घडणार यासंबंधीची उत्सुकता निर्माण केली जाते. म्हणणीत सूचित केलेले कथानक पात्रांच्या कृतियुक्तितून आणि घटनातून आकार घेत जाते.

पारंपरिक तमाशातील " सोंगाडया" याला फाटा देऊन त्या ठिकाणी वर्गजागृत " धोंडया" निर्माण केला आहे. या वर्गजागृत धोंडयाकडून आपल्या वर्गशत्रूवर जबरदस्त हल्ला चढविलेला दिसतो. पारंपरिक तमाशातील सोंगाडयाकडून केवळ विनोद निर्मिती घडविली जात होती. पण अण्णाभाऊंनी धोंडयाकडून निर्माण होणा-या विनोदाला उपरोधाची तीक्ष्ण धार दिली व मालक-भांडवलदार आणि शेटजी-भटजी यांच्यातील कपटी वृत्तीवर प्रकाश टाकलेला दिसतो. तसेच अण्णाभाऊंनी लोकनाटयामध्ये " धोंडया" हा केवळ विनोदासाठी आणला नाही, तर वर्गीय जाणीव " धोंडयां"च्या माध्यमातून प्रभावीपणे अविष्कृत झालेली दिसते.

पारंपरिक तमाशातील " झगडा" या प्रकाराचा उपयोगसुध्दा अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयात वेगळया प्रकारे केलेला दिसतो. आशुक-माशुकातील प्रेमाच्या विषयासाठी हा झगडा उपयोगात होता. पण अण्णाभाऊंनी मात्र याचा उपयोग राबणारा आणि

पिळणारा अशा दोन वर्गाच्या प्रतिनिधींच्या तोंडी घातलेला दिसतो. अण्णाभाऊंच्या या लोकनाटयातील बदलासंदर्भात एस. एस. भोसले म्हणतात " अण्णाभाऊंनी तमाशाचा पारंपरिक आकृतीबंध टरकावला. मात्र वगनाटयाच्या अंत:सौंदर्याच्या गढीवर आमूलाग्र बदलाचे निशाण रोवले.......तसेच पारंपरिकतेचा सांगाडा शाबूत ठेवल्याचा आभास जोपासून नवतेचे प्रयोग करण्याची लक्षणीय बौद्धिक चमक हे त्याचे विशेष रूप"[५]

तसेच अण्णाभाऊंनी लोकनाटयाच्या विषयातही बरीच बंडखोरी केलेली दिसते. सामान्य माणसाच्या जीवनातच त्याना खरा ध्येयवाद दिसला. म्हणून सामान्य माणूसच त्यानी आपल्या लोकनाटयातील विषयाचा केंद्रबिंदू बनविला. सामान्य माणसाच्या श्रमशक्तीला अभिवादन केले. व हुतात्मे, देशभक्त, लोकशाही, समाजवाद, साम्य-वादाचे वर्गीय लढे, यासारखे विषय समाजमनावर रुजविण्याचे कार्य अधिक योग्य पध्दतीने केलेले दिसते. समाजाला परिवर्तनाच्या शिख-राकडे नेणा-या किंवा परिवर्तन सन्मुख करणा-या जातिभेद विसर्जन, समाजसुधारणा, जीवनलढे या मुल्यांची पेरणी अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयातून केलेली दिसते. सामाजिक विषयाबरोबरच राजकीय विषयावर, काल्पनिक विषयावर कामगारांच्या जीवनांवर ग्रामीण जीवन व्यवहारावर आणि निवडणुकीतील दांभिकपणांवर तसेच साम्यवादी विचार अशा वेगवेगळया विषयांवर त्यांची लोकनाटये आढळतात. तेव्हा त्यांच्या लोकनाटय रचनेसंदर्भात नागनाथ कोतापल्ले लिहितात. " राजकीय वा राष्ट्रीय विचारधारेच्या प्रचारासाठी वग वापरुनही त्याला एक नाटयप्रकार म्हणून प्रतिष्ठा मिळू लागली ती अण्णाभाऊं व अमरशेखांपासून ".[६] साम्यवादी विचारप्रणाली अण्णा-भाऊंच्या लोकनाटयामधून अधिक प्रकर्षाने अविष्कृत झालेली दिसते. कारण साम्यवाद हा बहुजन समाजाकडे भूतदया दृष्टीने पाहणारा आहे.

यासंदर्भात सदा क-हाडे म्हणतात. " बहुजन समाजाकडे पाहण्याची नवी दृष्टी गांधीवादापेक्षाही साम्यवादाने अधिक दिली. ही वस्तुस्थिती अमान्य करता येणार नाही."[७] त्यामुळे अण्णाभाऊ हे साम्यवादाकडे अधिक झुकताना दिसतात. अण्णाभाऊंच्या या लोकनाटयाच्या स्वरूपा-विषयीच्या वरील विवेचनानंतर त्यांच्या लोकनाटयातील घटकांचा विचार पुढीलप्रमाणे केला आहे.

२. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील स्वभावचित्रण

कादंबरीतून कादंबरीकाराला स्वभावचित्रणाचा अविष्कार त्या व्यक्तिच्या मनात घोळत असणा-या विचारांचे सविस्तर वर्णन करून दाखविता येतो. परंतु एखाधा नाटककाराला किंवा लोकनाटयकाराला असे स्वभावचित्रण रेखाटत असताना काही मर्यादा पडतात. त्यामुळे नाटकातील किंवा लोकनाटयातील आशयाचा अविष्कार सांगत असताना त्याच्या मनातील विचाराचे फारसे दर्शन घडविता येत नसते. पण हे काम अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामध्ये बतावणीच्या रूपातून अविष्कृत केलेले दिसते. बतावणीतूनच स्वभावचित्रणावर अधिक प्रकाश टाकला आहे. त्या त्या व्यक्तिच्या मनातील असणा-या भावभावना अतिशय हळूवारपणे बतावणीतूनच चित्रित केलेल्या दिसतात. उदा. " अकलेची गोष्ट " या लोकनाटयामध्ये " बंडू " हा गवळी आहे. आपल्या बापजन्मीच्या श्रीमंतीचे समर्थन करताना म्हणतो.

" माझ्या घरात अगणित गायी म्हशींची खिल्लारं ।
रानात चरती चौफेर । कैक हजार । तान्ही वासरं ।। १
पाच हजार गाडी कडब्याची । वैरण रोजची खर्च आम्हाला
तीन हजार कुनबी एक जात । आमच्या घरात । गडी कामाला ।। २ ।।

यासारख्या वर्णनातून बंडूच्या श्रीमंतीचे दर्शन घडवित असताना बंडूचे

स्वभावचित्र आपल्यासमोर उभे रहाते.

अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील पात्रे ही समाजामध्ये असणा-या अनेक अडीअडचणी आणि वाटयाला आलेले दुःख निमूटपणे सहन करणारी आहेत. पण जेव्हा अन्यायाचीपरिसीमा होते. तेव्हा तीच पात्रे प्रस्थापित रचनेविरूध्द बंड पुकारताना दिसतात. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी तसेच कामगार यांच्या स्वभावाचे अतिशय सूक्ष्म व प्रत्ययकारी दर्शन ते घडविताना दिसतात. ग्रामीण जीवन आणि या जीवनांतील चाली, रिती, रिवाज, परंपरा यांचे दर्शन त्यांच्या लोकनाटयातून घडते. तेव्हा ही विविधता पाहिल्यानंतर दुःखी, दुबळया आणि न्यायी लोकांविषयी असणारा अपरंपार जिव्हाळा त्यांनी अनेक पात्रांच्यामधून निर्देशित केलेला दिसतो.

परिस्थितीमुळे गांजलेल्या कामगार आणि सर्वसामान्य माणसांची मने, स्वभाव त्यांनी जवळून पाहिल्यामुळे आणि अनुभवल्यामुळे ही माणसे त्याना अधिक जवळची वाटतात. अशा माणसांची व्यथा आपल्या लोकनाटयामधून चित्रित केली आहे. त्यामुळे त्यांच्या स्वभावचित्रणातून माणसाचे मन आणि भावना यांच्या उत्कटतेचा अविष्कार दिसून येतो. समाजजीवनांत प्रामाणिकपणे मालक-भांडवलदार यांची सेवा करूनसुध्दा शोषीकतेचे बळी ठरलेली आणि होणा-या अन्यायाविरूध्द पेटून उठणारी माणसे आपल्या लोकनाटयातून ते चित्रित करतात. त्यांचे वागणे बोलणे, आणि स्वभाव व जगण्याची रीत अतिशय प्रत्ययकारीपणे अण्णाभाऊंनी त्या त्या व्यक्तिच्या स्वभावचित्रणातून चित्रित केलेली दिसते.

अण्णाभाऊंनी पात्रांच्या परस्पर संबंधातून स्वभावचित्रणावर अधिक प्रकाश टाकला आहे. ज्याप्रमाणे मंदिरामध्ये गेल्यानंतर देवाला वाकून नमस्कार करणे. उच्चवर्णियांशी वागताना विनयशीलतेने वागणे किंवा श्रीमंत, भांडवलदार, राजकारणी लोकांच्या बरोबर

वागताना वागण्याबोलण्यामध्ये नम्रपणा राखणे. असे पारंपरिक संकेत ठरलेले आहेत. पण अण्णाभाऊंनी मात्र या पारंपरिक संकेताना " धोंड्या" सारख्या चतुर पात्राच्या माध्यमातून त्यांचे उल्लंघन केलेले दिसते. उदा. " शेटजीचे इलेक्शन" या लोकनाट्यामध्ये " मगरचंद " निवडणुकीला उभे आहेत. निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. अशा अवस्थेत " मगरचंद" " धोंडी , ए धोंड्या असे किंचाळतात तेव्हा.

" धोंडीबा - जी भाऊसाहेब, आलो ।

मगरचंद - बे अकली । कुठं गेला होतास गध्दया ? तू काय माणूस आहेस ?

धोंडीबा - ऑ ? म्हंजी ? मी मानूस नव्हं म्हणता?

मगरचंद - गाढव ।

धोंडीबा - ऑ गाडाव । मी काय लाथा झाडतोय ?

मगरचंद - उलट बोलतोस आणि गध्दया ?

धोंडीबा - गध्दया। मालक, माजं नाव धोंडीबा हाय। गावातली लोक मला काय वाटेल ते म्हणत्यांत नि तुमीबी -

मगरचंद - काय म्हणतात गावात लोक ?

धोंडीबा - कोण म्हणातय गुजराचा कुतरा, तर कोण म्हणातंय कुराडीचा दांडा । धड मी आभाळा-तबी न्हाई आणि जिमिनिवरबी न्हाई। दोडका।

मगरचंद - मूर्ख लेकाचे । अकला आहेत काय त्यांना ?

धोंडीबा - तुमीबी तेंच्यावानीच ।"[९]

वरील पात्राच्या परस्पर संबंधामुळे त्या त्या व्यक्तिच्या स्वभाव-चित्रणावर अधिक प्रकाश टाकलेला दिसतो.

तसेच " बेकायदेशीर " या लोकनाटयामध्ये कामगार मिळणाऱ्या पगारामध्ये पोट भरत नाही म्हणून संप करतात. तेव्हा वर्गजागृत " धोंडया" आपला मालक " मगरचंद" याला सांगतो की आम्ही तुम्हाला काही लोकोपयोगी कामे कराल म्हणून निवडून दिले. पण आता मात्र सर्वसामान्य जनतेला, कामगाराला विसरलात. यावरती मगरचंद चिडून म्हणतात, " आम्हाला मतं दिली म्हणजे काय उपकार केला आमच्यावर ? आम्ही मतं घेतली ती काय संपाच्या बोलीन ? हे पहा आम्ही सारं जाणतो हे संप म्हणजे आमची मिनिस्ट्री - आमच सरकार उलथून पाडण्यासाठी कम्युनिस्टानी रचलेलं कारस्थान आहे." [10] याठिकाणी वर्गजागृत " धोंडया" आणि " मगरचंद " या पात्रांच्या परस्पर संबंधातून कम्युनिस्टांच्या कार्यपध्दतीवर प्रकाश टाकलेला दिसतो.

अण्णाभाऊंच्या सर्वच लोकनाटयातील प्रत्येक पात्रांचा विचार करता अन्याय करणारी आणि अन्याय सहन करणारी अशी दोन प्रकारची पात्रे अविष्कृत झालेली दिसतात. अन्याय सहन करणारी पात्रे ही फसली जातात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शेटजी, शेट सावकार आपले डाव साधतात. मात्र ही गरीब, सर्वसामान्य जनता जागृत झाली पाहिजे.याची आस अण्णाभाऊंना आहे. म्हणून विष्णू, सत्तू सारख्या पात्रांच्या माध्यमातून अन्यायाविरूध्द पेटून उठणाऱ्या व्यक्तींच्या स्वभाव वैशिष्टयावर प्रकार टाकलेला दिसतो.

अण्णाभाऊंनी लोकनाटयामध्ये राजकीय, सावकारी, शेटजी, भटजी अशी वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तीची पात्रे उभी केली आहेत. त्यांच्यामधील बेरकीपणा, सहजपणे सामान्यजनांना फसविण्याची वृत्ती जशी दिसते.तसेच अन्याय, अत्याचार करूनसुध्दा ताठमानेने उभी आहेत.हे सांगत असताना याला प्रत्युत्तर देणारी " धोंडया" " सत्तू" "विष्णू" सारखी चतुर पात्रे या दुटप्पी वागणाऱ्या माणसांची फजिती करतात. याचे उत्कृष्ट दर्शन " शेटजीचे इलेक्शन" मधून पहावयास मिळते. किसान

सभेचा कार्यकर्ता " सत्तू " हा " मगरचंद " या शेटजीस म्हणतो की रशियात, बल्गेरियात आणि पोलंड देशात गरीबाना जमिनी वाटल्यात. तेव्हा तुम्हीपण निवडणुकीला उभे आहात. तर तुमच्याबी जमीनी वाटा की यावर मगरचंद म्हणतात,

मगरचंद - अर ते तिकडं झालं । इथ कसं कोण करणार ?
तारा - किसान सभेचा लाल बावटा ।
मगरचंद - लाल बावटा काय रशियातून जमिनी आणणार नि वाटणार ?
तारा - ते कशापायनं ? माप तुमच्यावाणी एक एकाच्या घरात हजार हजार दोन हजार एकर जमिनी पडलियां ।
धोंडीबा - मग मालक असं करूया- आपली हजार एकर जमीन टाकूया वाटून, नि घेऊ या मतं ।
मगरचंद - गध्या माझी घरची जमीन वाटू ? "[11]

वरील प्रसंगातील संवादामधून त्या त्या व्यक्तीच्या स्वभाववैशिष्टयातील गुणदोष अधिक प्रत्ययकारीपणे उमगताना दिसतात.

वरील प्रमाणे स्वभावचित्रण रेखाटत असताना सामाजिक समस्येवर भर देण्याबरोबरच व्यक्तिच्या भावविशेषावरही अण्णाभाऊंनी जास्त लक्ष केंद्रित केलेले दिसते. त्यामुळे त्यांची स्वभावचित्रण पध्दत ही वर्णनातून, निवेदनातून व संवादातून अधिक प्रत्ययकारीपणे चित्रित केलेली दिसते. असे करत असताना या व्यक्तिचित्रणातून व्यक्तिच्या ठायी असणा-या काही निष्ठाही त्यानी दाखवून दिल्या आहेत. यामध्ये " पुढारी मिळाला" या लोकनाटयातील " डोईफोडे" सारख्या भ्रष्ट कॉंग्रेसे नेत्याला घरी पाठवून सत्तू सारख्या कर्तव्यशील व्यक्तीला नेता करण्यास गावचा पाटील मागे पुढे पहात नाही.

अण्णाभाऊंना अशी अनेक अन्याय करणारी माणसे भेटली, ती पाहिली. त्यांचे चित्रण मंत्री मगरचंद, लाडोबा, मुनिमजी यांच्या माध्यमातून करुन त्यांच्या स्वार्थी वृत्तीवर प्रकाश टाकलेला दिसतो. जशी स्वार्थी वृत्तीची अनेक माणसे त्यानी आपल्या लोकनाटयातून चित्रित केली. त्याप्रमाणे दुःखाने वेढलेली, निमुटपणे दुःख गिळून जगलेली माणसे जेव्हा त्यांच्यावरील अन्याय टोकाला जातो त्यावेळी प्रस्थापित रचनेविरुध्द बंड करणारी माणसेसुध्दा अनेक लोकनाटयातून अविष्कृत झालेली दिसतात. एकूणच अण्णाभाऊंना सामान्य माणसाचे दुःख पाहून त्यांची भावावस्था प्रकट करणे हेच त्यांच्या स्वभावचित्रणाचे वैशिष्टय आहे.

वरील स्वभावचित्रण रेखाटण्याची विविध रुपे पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, नाटयमय पध्दतीने व कल्पनारम्य भाषेत स्वतःच्या जीवनानुभूतीतून स्वभावचित्रणाचा अविष्कार ज्याठिकाणी होतो, तो अविष्कार ती कलाकृती आपणास अधिक मोहीत करते. स्वभावचित्रण साधे, सरळ असो, अगर गुंतागुंतीचे असो त्यामधील व्यक्तीरेखा त्याच्या हेतूशी स्वभावाशी, कृतीशी आणि घटनेशी, ज्यात-हेने लेखकाने अविष्कृत केलेली असते. त्याच्यावरतीच स्वभावचित्रणाचे यशापयश अवलंबून असते. म्हणजेच स्वभावचित्रणातून व्यक्तिदर्शन घडत असते. आणि ते अधिक प्रभावी होण्यासाठी संवाद आणि भाषा यांचा सुरम्य संगम व्हावा लागतो. याची प्रचिती अण्णाभाऊंच्या लोकनाटयातून येताना दिसते.

### ३. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील प्रसंगनिर्मिती :

जीवनाला पुष्कळदा संग्रामाची उपमा देण्यात येते. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आयुष्यात कुठे ना कुठे कुणासीतरी का होईना झगडा करण्याचा प्रसंग येतोच. अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामधून असा झगडा राबणारा आणि पिळणारा यांच्या माध्यमातून दाखविलेला आहे. अशा काही प्रसंगाची गुंफण करुनच त्यानी कथानकाचा घाट सजविलेला दिसतो.

त्यादृष्टीने त्यांच्या प्रसंगनिर्मितीचा विचार करता कामगार, मजूर हा आता जागृत झाला आहे. आपल्या न्याय्य हक्कासाठी तो कुठल्याही आव्हानाला सामोरं जाण्याची त्याची तयारी आहे. ही जाण लक्षात घेऊनच त्यानी केलेली प्रसंगनिर्मिती ही उल्लेखनिय आहे. उदाहरणार्थ त्यांच्या " बेकायदेशीर " या लोकनाटयामध्ये कामगार आपण करत असलेल्या कामाचे योग्य मोल मिळावे. यासाठी गिरणी मालक रघुनाथमल यांच्याकडे पगारवाढीसाठी मागणी करतात. पण रघुनाथमल हे मनावर घेत नाही. त्यामुळे सर्व कामगार संप करतात. मंत्री " मगरचंद" गिरणीमालक " रघुनाथमल" यांच्या घरातील घरगडी-सुध्दा, संपामध्ये सामील होतात. त्यामुळे रघुनाथमल आणि मगरचंद याना वेळेवर जेवण मिळणेसुध्दा कठीन होते. लोकनाटयातील संपूर्ण कथानकच कामगारानी केलेला संप आणि त्याचा मालक-भांडवलदार लोकांच्यावर होणारा परिणाम यामुळे सजलेले आहे. पण शेवटी अगदी कथानकाच्या अखेरीस ज्यावेळी दहा हजार लोकांचा मोर्चा जेव्हा यांच्या घरावर जातो तेव्हा घाबरुन गिरणीमालक रघुनाथमल गोंधळतो. आणि कामगारांच्या मागण्या मान्य करतो. याठिकाणी कथानकाच्या शेवटी निर्माण केलेली प्रसंगनिर्मिती यामध्ये " रघुनाथमल "चे घाबरणे आणि कामगारांची एकता ही रसीकमनावर प्रभाव करुन जाते.

प्रसंगनिर्मितीसाठी ब-याचवेळा दोन विरोधी स्वभावाची माणसे चित्रित करावी लागतात. अण्णाभाऊंनी अशी दोन परस्पर विरोधी स्वभावाची माणसे चित्रित केली आहेत त्यातून शोषक आणि शोषीत अशा वृत्तीचे चित्रण केलेले दिसते. आणि त्यामधून प्रसंगनिर्मितीला अधिक उठावदारपणा आलेला दिसतो. उदाहरणार्थ " खापण्या चोर" या लोकनाटयातील " दाजीबाजी " या शेतक-याला त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन भोलाराम सावकार फसवितो. त्यामुळे दारिद्रयाने गांजलेला " दाजीबाजी " परिस्थितीमुळे " खाप-या चोर " नावाने प्रसिध्दला येतो. यावेळी तो गावात व परिसरात कोणालाही भीत नाही.

त्यामुळे हिकमती " खाप-याचोराचे घाबरविणे व " भोलाराम सावकाराचे घाबरणे यातून निर्माण झालेली प्रसंगनिर्मितीही उल्लेखनिय आहे.

प्रसंगनिर्मिती करताना अण्णाभाऊंची शब्दकळा अतिशय प्रभावी बनते. विषय रुक्ष असला तरी तो अतिशय रंजक व प्रभावशाली करण्यासाठी त्यांची हातोटी वैशिष्टपूर्ण अशी दिसते.

एकूणच प्रसंगनिर्मिती करताना अण्णाभाऊंनी लोकनाटयातील आशयाच्या किंवा घाटाच्या बाबतीत कसलाही साचा न ठेवता जाणिवेचा मुक्त शोध घेणारी व सत्याच्या दर्शनासाठी सामोरी जाणारी अशी दीन-दुबळी, पददलित, दुःखी, कष्टी माणसे आपल्या लोकनाटयाचा विषय बनवून त्यांच्याच जीवनांतील अनेक घटनाप्रसंगाची गुंफण करुन केलेली प्रसंगनिर्मिती ही उल्लेखनिय आहे.

## ४. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील संघर्ष :

लोकनाटयाला खरे " नाटय " प्राप्त होण्यासाठी व रंगत लाभण्यासाठी जो गुण अत्यावश्यक असतो तो म्हणजे " संघर्ष." संघर्ष हा कथानकाचा आत्मा समजला जातो. अशा संघर्षाला समरप्रसंग झगडा, द्वंद्व, अशी वेगवेगळी नावे समीक्षकांनी वापरलेली दिसतात. जीवनात जर संघर्ष नसेल तर ते एकमार्गी होईल. जीवनात खळबळ नसेल, स्पर्धा नसेल, काही उदात्त ध्येयासाठी निष्ठायुक्त धडपड नसेल. तर ते रुचकर वाटणार नाही. त्यामुळे मानवी जीवनाला संघर्षामुळेच उत्कटता व आकर्षकता प्राप्त होते. यासंदर्भात मो. द. ब्रम्हे म्हणतात. "शृंगार वीर, करुण हास्य अशा मूलभूत प्रभावी रसांचा उठाव करण्यास संघर्ष हा प्रेरक ठरतो." [१२]

अण्णाभाऊ आपल्या लोकनाटयामधून असा संघर्ष दोन व्यक्ती किंवा दोन पक्ष यांच्यामधील संघर्ष दाखवितात. हे अण्णाभाऊंच्या लोकनाटयाचे वैशिष्टय आहे. शोषक आणि शोषीत हया प्रवृत्ती

व दोन पक्ष म्हणजे कम्युनिस्ट आणि काँग्रेस, यांच्यातील संघर्षाची बीजे त्यांच्या लोकनाटयामधून पदोपदी विखुरलेली दिसतात. म्हणजेच त्यांच्या लोकनाटयातील संघर्ष हा दोन व्यक्तीत " दोन गटात" किंवा " व्यक्ती विरुद्ध परिस्थिती" अशा स्वरूपाचा दाखविलेला दिसतो. " माझी मुंबई " या लोकनाटयामध्ये विष्णू, बाळकू, आणि अंतू हे सामान्य कामगार असून मुंबई ही अखील महाराष्ट्राची आहे. ती कोणा एका स्वतंत्र गटाची वा व्यक्तिची नाही. असे आवर्जून सांगतात. पण कथानकातील मुनिमजी आणि लाडोबा हे भांडवलदार मात्र ही मुंबई महाराष्ट्राची नाही तर ती मुळातच वेगळी आहे. आणि याला भरभक्कम पुरावा आहे. असे सांगत असताना या दोन गटामधील संघर्ष विकोपाला गेलेला दिसतो. आणि या संघर्षामुळेच दोन गटातील तेजस्वी गुण कसोटीला लागलेला आहे. शेवटी या दोन गटातील सद्गुणी व न्यायी म्हणून विष्णू, अंतू आणि बाळकू तर दुर्गुणी व अन्यायी म्हणून " मुनिमजी " आणि " लाडोबा" हे कसे आहेत ते नाटयातील संघर्षा-मुळेच अधिक स्पष्ट होताना दिसते.

अण्णाभाऊंच्या एकूणच लोकनाटयांचा विचार करता बहुतेक लोकनाटये जवळ जवळ संघर्षालाच प्रमाण मानणारी दिसतात. "पुढारी मिळाला" मधील नेता होण्यासाठी धडपड करणारा " डोईफोडे " साहेब यांच्या मनातील संघर्ष, विचार व भावना यांच्या उलट सुलट आवेगामुळे अण्णाभाऊंच्या लोकनाटय रचनेतील संघर्षाची सखोलता आढळून येते. " पेंग्याचे लग्न" मधील गांवकर यांच्याकडे पारंपरिक पध्दतीने चालत आलेला अधिकार हा तसाच रहावा. यासाठी चाललेली धडपड व राणू हा नव्या पुरोगामी विचाराचा आहे. त्यामुळे त्या अधिका-रावर मात करून कुणबी सेवा संघाची तत्व कशी योग्य आहेत. हे सांगण्यासाठी चाललेली त्याची धडपड. यामधून अण्णाभाऊंनी संघर्षाचा कळस साधलेला दिसतो. " बेकायदेशीर " या लोकनाटयातील रघुनाथमल

आणि मगरचंद हे भांडवलशाहीधार्जीने लोक यानी सत्तू, धोंडी आणि इतर सर्व गिरणी कामगार यांना लुबाडण्यासाठी केलेला छटाटोप व शेवटी आपल्या मागण्या मान्य होण्यासाठी गिरणी कामगारानी केलेला संप या दोहोंच्या ताणतणावामुळे निर्माण झालेला संघर्ष किंबहुना त्या संघर्षाची विविध रूपे ही सर्वसामान्य माणसापासून एखाद्या विद्वानापर्यंत सर्वांनाच हलविणारी आहेत. " लोकमंत्र्याचा दौरा" या लोकनाटयामध्ये ग्रामीण जीवनात निर्माण होणारे अनेक प्रश्न व समस्या त्यांची सोडवणूक करण्यासाठी राजकीय लोकांची भूमिका यांच्या माध्यमातून चितारलेला संघर्ष हा अतिशय नाटयमय पध्दतीने अविष्कृत झालेला दिसतो.

एकूणच वरील लोकनाटयातील संघर्षाच्या विवेचनावरून संघर्षाला किती असामान्य स्थान आहे हे दिसते. त्यामुळे अण्णाभाऊंच्या लोक-नाटयातील संघर्ष हा एकप्रकारचा नसून तो बहुविध स्वरूपाचा आहे. कथानकाची गुंतागुंत व त्यामुळे निर्माण होणारा संघर्ष यामुळे चमत्कृती निर्माण होते व वाचक-प्रेक्षकांच्या मनावर प्रभाव करण्यासाठी ती कलाकृती अधिक समर्थ ठरते. याची जाण अण्णाभाऊंच्या लोकनाटयामधून येताना दिसते. त्यामुळे संघर्ष हाच नाटयातील प्रधान घटक मानने क्रमप्राप्त ठरते.

अण्णाभाऊंना आपले जीवन अनुभवित असताना अनेक कठीण संकटाना सामोरं जावे लागले, संघर्ष करावा लागला आणि या संघर्षातूनच एक एक नाटयवस्तू निर्माण झालेली दिसते. व त्यामधून भांडवलशाही व भ्रष्ट राजकीय नेत्याविरूध्द बंड, सामान्य जनतेविषयी कळवळा, लोभ, कारूण्य, वात्सल्य व उदात्तता या गुणांची जाणीव होते.

## ५. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील विनोद :

सर्वसाधारणपणे मानवी जीवन व्यवहारात काही संकेत ठरलेले असतात. अशा संकेतांची जेव्हा टर उडविली जाते. तेव्हा विनोद निर्मिती होते. मानवी जीवनातील दुःख, निराशा या थोडयाफार प्रमाणात

कमी करून मन हलके करण्यासाठी विनोदाला महत्वाचे स्थान आहे. काही शाब्दिक कोटीचा विनोद निर्माण करून एखाद्या व्यक्तिची टर उडविण्यासाठी विनोदाचा उपयोग होताना दिसतो. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील वर्गजागृत धोंडया आणि त्याचा मालक यांच्या संवादातूनच असे शाब्दीक कोटीचे विनोद निर्माण करून मालकाच्या ढोंगीपणावर प्रकाश टाकलेला दिसतो.

अण्णाभाऊंनी पात्राच्या परस्पर संबंधातूनही विनोद निर्मिती घडविलेली दिसते. श्रीमंत आणि गरीब यांच्या वागण्या-बोलण्यामध्ये काही पारंपरिक संकेत ठरलेले आहेत. गरीबानी श्रीमंताना किंवा मोठया इभ्रतीच्या माणसाना उलट बोलू नये किंवा ते बोलताना तोडीस तोड लावू नये. असे पारंपरिक संकेत ठरलेले आहेत. पण अण्णाभाऊंनी मात्र आपल्या लोकनाटयामध्ये अशा संकेतांचे उल्लंघन करून " धोंडया " या चतुर पात्राच्या तोंडी काही विनोदी संवाद घालून श्रीमंत, भांडवलदार व भ्रष्ट राजकारणी लोकांची टर उडवून विनोद निर्मिती साधलेली दिसते. उदाहरणार्थ, मालकाने " धोंडया" म्हणून हाक मारताच तो मालकाला म्हणतो. माझं नाव धोंडी, डी, डीऽऽ डला या डया न्हवं, यावती मालकाने गाढवा! उलटउ उत्तर देतोस मला ? असे म्हणताच " मी गाढाव न्हाय, माणूस हाय ! असा धोंडबाने जबाब दिलाच. याठिकाणी " धोंडयांची" ही उत्तरे जसी वर्गीय जाणीव प्रकट करणारी आहेत. तसीच कामगार शोतक-यांच्या हृदयाला गुदगुल्या करणारी आहेत. याठिकाणी अशाप्रकारचे विक्षिप्त स्वरूपाचे विनोद निर्माण करून " धोंडया" च्या माध्यमातून अण्णाभाऊंनी सामान्यजनाना स्वाभिमानाने जगण्याचे धडे शिकविलेले दिसतात. या विक्षिप्त स्वरूपाच्या विनोदासंदर्भात गो. मा. पवार म्हणतात. " विनोदाचे तिसरे एक रूप संभवते, हया विनोदरूपात वास्तवातील अनुभवाची मोडतोड करून तो विक्षिप्त स्वरूपात मांडलेला असतो. त्यासाठी स्थानांतर व संक्षेपीकरण या तांत्रिक वैशिष्टयांचा उपयोग केला जातो. कोणत्याही प्रकारची

बंधने, दडपणे आपल्यातील चैतन्याला गुदमरवून टाकत असतात. सामाजिक नियमने, रुढी, अधिसत्ता चैतन्यास प्रकट होऊ देत नाहीत. विचारपध्दतीतील कार्यकारणभावाचा असाच जाच आपल्याला सतत सहन करावा लागतो. ही दोन्ही प्रकारची बंधने झुगारल्यावर आपल्याला विमुक्ततेचा जो प्रत्यय येतो तो सुखात्म स्वरूपाचा प्रत्यय असतो. वग-प्रहसनांत देव, राजा, बाप या अधिसत्तांबद्दलचा धाक त्यांचे विपर्यस्त चित्रण केल्यानंतर नाहिसा झाल्यासारखा वाटतो, व आपल्याला विमुक्ततेचा प्रत्यय येतो." [१३] प्रसंगचित्रणामध्ये पात्रांच्या परस्पर संबंधामध्ये आणि अनुभवाच्या मांडणीमध्ये विक्षिप्तपणाचा वापर झाल्याने विनोदाची निर्मिती होते. पात्रांचे वर्तन अशा विक्षिप्त स्वरूपामध्ये लोकनाटयातून व्यक्त केलेले असते की त्यामुळे सहजपणे आणि चमकदार स्वरूपाचा विनोद निर्माण होत असतो. या गोष्टीचा प्रत्यय गो. मा. पवार यांनी केलेल्यावरील विवेचनातून स्पष्ट होतो.

पारंपरिक तमाशामध्ये विनोद हा मुख्यत्वेकरुन सोंगाडयाकडूनच घडविला जात होता. अण्णाभाऊंनी मात्र सोंगाडयाऐवजी वर्गजागृत धोंडया निर्माण केल्यामुळे धोंडयाच्या माध्यमातून विनोद निर्मिती साधलेली दिसते. किंवा ग्रामीण जीवनांतील एखादे साधे भोळे पात्र निर्माण करुन त्याच्या विक्षिप्त स्वरूपाच्या वागण्या बोलण्यातून विनोद निर्मिती साधलेली आहे. " पेंग्याचे लग्न " या लोकनाटयातील " पेंग्या" या अस्ताव्यस्त स्वरूपाच्या पात्रामधून निर्माण केलेला विनोद हा रसीक मनावर अधिक प्रभाव करणारा आहे. " पेंग्या" हा साधा भोळा असल्यामुळे त्याच्या लग्नाला अनेक विघ्न येतात. शेवटी त्याचे लग्न ठरते ते पुतळाशी. पण ही वार्ता पुतळाला माहीत नसते. पुतळा ही सुंदर आणि व्यवहारचतुर असून " पेंग्या"च्या घरचे व पुतळाच्या घरचे पूर्वीपासून चांगले संबंध असतात. त्यामुळे आपले लग्न ठरले आहे. ही वार्ता सांगण्यासाठी " पेंग्या" खुष होऊन पुतळाच्या

घरी जातो. तेव्हा आपल्या बायकोचे वर्णन करताना पेंग्या पुतळाला म्हणतो. माझी बायको अगदी अगदी तुझ्यासारखीच आहे. तेव्हा पुतळा चिडून हातात केरसुणी घेऊन " पेंग्यावर" धावते. तेव्हा पेंग्या नाक पुसत म्हणतो मला नको तुझ्यासारखी मारक्या म्हैशीसारखी मारकी नवरी। पेंग्याच्या या संवादामधून साधलेला विनोद हा रसीक मनावर दिर्घकाल परिणाम करणारा आहे. पेंग्याचे वागणे आणि त्याच्या प्रत्येक संवादातून साधलेला दृष्य विनोद हा रसिकांना हलवून सोडणारा आहे.

काही लोकनाटयामध्ये शब्दाला एकदम कलाटणी दिल्यामुळे अर्थामध्ये झटकन बदल होऊन विनोद निर्मिती घडविलेली दिसते. म्हणजेच अर्थाच्या विपर्यासामधून विनोद निर्मिती साधलेली दिसते. अशा प्रकारामध्ये धोंडया एखाद्या शब्दाला इतकी झटकन कलाटणी देतो की, ऐकणारे प्रेक्षक लोक आश्चर्यचकित होतात आणि त्यांची भरपूर करमणूक होते.

अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील विनोदाचे स्वरूप ग्राम्य किंवा बीभत्स अशा स्वरूपाचे नाही. यासंदर्भात बी. एम. पाटील लिहितात. " त्यांच्या विनोदानासुध्दा एक दर्जा होता. त्यात उत्तानता, कामुकता नव्हती. देशातील राजकीय आणि सामाजिक जीवनांतील दांभिक गोष्टी लोकांच्यासमोर उघडया करून दाखविण्यासाठी अशा गोष्टींचे विडंबन करून ते खुसखुशीत विनोद घडवीत."[18] म्हणजेच भांडवलदार व राजकारणी लोक सामान्य कामगार माणसांवर कसे विसंबून असतात. आणि ज्यावेळी सर्वसामान्य कामगार संप करतात. त्यावेळी भांडवलदार लोकांची कशी फटफजिती होते. हे अतिशय विनोदी शैलीतून चितारलेले आहे. याठिकाणी त्यांचा विनोद हा अतिशयोक्तीपूर्ण असा कुठेही दिसत नाही. तर वास्तव जीवनांतील ताजी बटबटीत अशी कित्येक उदाहरणे घेऊन विनोद निर्मिती घडविलेली दिसते.

त्यांच्या " बेकायदेशीर" या लोकनाटयामध्ये आपल्या कामाबद्दलचा योग्य मोबदला मिळावा. यासाठी एखाद्या घरातील घरगडयापासून सरकारी नोकरी करणाऱ्या पोस्टमन पर्यंत सर्वजण संप करतात. तेव्हा गिरणी मालक " रघुनाथमल " आपला नोकर " धोंडया" यास म्हणतो.

" रघुनाथमल - ती गंगा आली का बघ आणि त्या सधाला विचार
फोन बिन कुणाचा आला होता का.

धोंडी - ( जाऊन येतो ) सकाळच्यान् वाचा बसल्यावाणी
थंडगार बसलाय त्यो फोन. हूं का चू करीत न्हाई !

रघुनाथमल - मग कुठं बिघडलाय का चौकशी कर बघू

धोंडी - इकडं नाही बिघडला ?

रघुनाथमल - मग कुठं कंपनीत बिघडला

धोंडी - कंपनीतला कामगार बिघडला असल ! संप !

रघुनाथमल - अरे बापरे ! जिकडं तिकडं संप म्हणजे काय हे ! "[15]

यानंतर घरातील घरगडीही संपावर गेलेला असतो. ड्रायवरही संपावर जातो. आणि शेवटी धोंडया म्हणतो आता मी ही संपावर जात आहे. तेव्हारघुनाथमल चिडतो आणि मंत्री मगरचंद याना भेटण्यास चालत जातो. तेव्हा धोंडया म्हणतो आता हळू जावा. न्हाईतर तुमचे पायही संप करतील. वरील सर्व संवादामधून साधलेला शाब्दिक कोटीचा विनोद हा रसिक मनाच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडणारा आहे.

अण्णाभाऊंनी काही लोकनाटये " विनोदी फार्स " अशा स्वरूपात लिहिलेली आहेत. यामध्ये लोकनाटयाला अधिक रंगतदारपणा आणलेला दिसतो. तसेच कमीत कमी वेळात रसीकमनावर जास्तीत जास्त परिणाम साधला जातो. त्यादृष्टीने " बिलंदर बुडवे " " पेंग्याचे लग्न" आणि " अकलेची गोष्ट " यासारख्या लोकनाटयांचा उल्लेख करता येईल. त्यांच्या " बिलंदर बुडवे " सारख्या लोकनाटयामधून ग्रामीण भागातील बुडव्या लोकांच्या जीवनावर अतिशय विनोदी संवादातून प्रकाश टाकलेला दिसतो. हे लोकनाटय म्हणजे एक विनोदी फार्सच आहे. त्यांच्या या लोकनाटयातील राणू आणि हौसा हे पती-पत्नी असून प्रामाणिक पण शेरास सव्वाशेर आहेत. तर " बाबू " बुडवेगिरी

करणारा आहे . कोणाचेही घेतलेले कर्ज परत न करणारा असल्यामुळे त्याचे नांवच बुडवे पडलेले आहे हे नांवसुध्दा रसिकांना हसविणारेच आहे. लोकनाटयातील " राणू " हा " बुडवे " यास वीस रुपये कर्ज देतो. आणि एक वर्षाने परत घेतेवेळी एक हजार रुपये दिले पाहिजेत असा कागद करून घेतो. बुडव्याने घेतलेले कर्ज परतफेड करण्यासाठी " राणू " जातो. तेव्हा " राणू " आणि " बुडवे " यांच्यातील प्रत्येक संवादातून निर्माण झालेला विनोद हा गावगुंड, भामटया माणसाची व्यक्तीरेखा रेखाटण्यास अधिक समर्थ ठरलेला दिसतो. तसेच काही ठिकाणी विक्षिप्त स्वरूपाचेही विनोद आढळतात. या विक्षिप्त स्वरूपाच्या विनोदासंदर्भात गो. मा. पवार लिहितात," या प्रकारच्या विनोदाला आपण कोटी-रूप विनोद असे म्हणू शकतो. हे कोटीरूपत्व लहानशा चुटक्यांतून जसे आढळते. तसेच कथांतून वग-प्रहसनांतून आढळू शकते. विनोदाच्या या प्रकारात तांत्रिक वैशिष्टयावर भर असला तरी त्याचा संबंध जीवित-जाणिवेशी काहीएक प्रमाणात का होईना असतो".[१६]

एकूणच अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील विनोद हा ठायी ठायी मोठया उत्कटतेने आणि रसिकतेने नटलेला आहे. त्यांच्या विनोदामध्ये कुठेही अश्लीलता, ग्राम्यता किंवा बिभत्सपणा आढळत नाही. सरळ सरळ खटकेबाज संवादातून शाब्दीक कोटया करून विनोद निर्मिती साधल्यामुळे त्यांचा विनोद हा शीलवान आहे. ढोंगी, आपमतलबी माणसांचे वाभाडे त्यांच्या विनोदामधून काढलेले दिसतात.

### ६. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील संवाद :

कोणत्याही लोकनाटयातील कथावस्तू ही संवादाद्वारेच प्रकट होऊन प्रगत होत जाते. कथा कादंबरीतील संवाद हा वाङ्‌मयीन बंधाच्या रचनेचा एक भाग म्हणून संवाद असतो. पण लोकनाटयातील संवाद हा एक भाग म्हणून तो साकार होत नाही. तर सर्व लोकनाटयच संवादमय असते. किंबहुना संवादशिवाय नाटयाची निर्मितीच होऊ शकत नाही. त्यामुळे

संवाद हा लोकनाटयाचा प्रमुख घटक आहे. म्हणून कोणत्याही लोकनाटयातील कथावस्तू आणि पात्र यांच्या जोडीने संवादालाही नाटयरचनेत तितकेच महत्वाचे स्थान असते.

त्यादृष्टीने पहाता अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील नाटयरचना म्हणजे नुसती अनेक प्रसंगांची गुंफन नाही. तर त्या प्रसंगाच्या चित्रणात आणि रचनेमध्ये घटना घडत असताना पात्रांच्या संवादामधूनच तत्संबध्द भाव व्यक्त केलेला दिसतो. " माझी मुंबई " या लोकनाटयातील " विष्णू " आणि मुनिमजी यांच्या संवादामधूनच मुंबई ही खरी कोणाची आहे. हा तत्संबध्द भाव दोघांच्या संवादातूनच प्रकट होताना दिसतो. काही रंजक तर काही शोकात्म संवाद निर्माण करुन लोकनाटयातील नाटयनिर्मितीला अधिक उठावदारपणा आणलेला दिसतो.

अण्णाभाऊंनी असे संवाद निर्माण करताना त्यांच्या लोकनाटयातील संवाद आणि त्यास अनुसरुन केलेली प्रसंगनिर्मिती ही रसिक मनावर प्रभाव करुन जाते. त्यांच्या लोकनाटयातील बरेचसे संवाद हे पद्यरुपानेसुध्दा अविष्कृत झालेले दिसतात. उदाहरणार्थ " माझी मुंबई" या लोकनाटयामध्ये " विष्णू " आणि " मुनिमजी " यांचा मुंबई कोणाची या विषयावर लागलेला वाद हा पद्यरुपानेच अविष्कृत झाला आहे.

" मुनिमजी - तोंड पैशाचं सोडलं । कारखानं काढलं ।
वैभवशाली केली हिला ।।

विष्णू - आकाश माझं । धरणी माझी
कशी यावी ही उप-याला ।।४।।"[१७]

यासारख्या संवादातून मुंबई ही कोणा एकाची नसून ती अखील महाराष्ट्राची आहे.हे " विष्णू "च्या संवादामधून अधिक स्पष्ट होताना दिसते.

एकूणच अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील संवादाचा विचार करता असे गद्यस्वरूप संवादानी लोकनाटयाचे कथानक सजले आहे. त्याच-प्रकारे पद्यमय संवादसुध्दा रसीकमनावर एखादी गोष्ट अधिक प्रभावशाली करण्यास समर्थ ठरलेले दिसतात. त्यामुळे " अण्णाभाऊंच्या लोकनाटयानी मराठी नाटयसृष्टीत एक नवीन तांत्रिक भर घातली." [१८] असे वि. स. जोग म्हणतात.

लोकनाटयातील संवाद हाच आत्मा असतो. लोकनाटयामध्ये आपल्या लक्षात रहाणारी जास्तीत जास्त गोष्ट म्हणजे संवाद. अण्णाभाऊंनी शांतिक्रांतिकेपासून सुखात्मीतेपर्यंत जी अनेक लोकनाटये लिहिली. त्या सर्वच लोकनाटयामध्ये संवादाच्या बाबतीत दक्षता घेतलेली दिसते. यामध्ये त्याच्या संवादातील खटके, अर्थचमत्कृती आणि कल्पना चमत्कृती यामुळे पारंपरिक तमाशातील संवादरचनेची चौकट मोडून ( उदा. गद्य संवादाची) वेगळया विषयाच्या आणि आशयाच्या बाबतीत मोलाची भर घातलेली दिसते. त्यांच्या लोकनाटयातील असे संवाद हे छोटे छोटे असून साधे आणि सरळ आहेत. ब-याच लोकनाटयामध्ये प्रश्नोत्तराच्या स्वरूपामध्येही संवादाची रचना झालेली दिसते. त्यामुळे अशी लोकनाटये चटकदार होऊन रसीकमनावर अधिक प्रभाव करतात. त्यांच्या " शेटजीचे इलेक्शन " या लोकनाटयामध्ये " तारा" ही वर्गजागृत स्त्री शेटजीच्या गैरवर्तनाचे वर्णन करताना शेटजीचा नोकर " धोंडया" याला सुनावते.

" तारा - अर कुणाचं खातुयास ? त्या मगरचंदाचं ? तेच्या बानं तरी कदी नांगोर बगितलाता काय रं ? तुझ्या त्या मालकाला बैलाला कासरा कसा लावत्यात ते तरी ठावं हाय का ? का रं, आता का वाचा बसली ? सांग की, कोण राबतय शेतात तू का तुजा मालक ?

धोंडबा - ताराक्का, मला तरी कळच ना बगा काय !

तारा - लाल बावटयाला शिव्या द्याच कळतंय ? किसानसभेला शिव्या द्याचं कळतंय ?" [१९] यासारख्या संवादांचा सूक्ष्मरितीने अभ्यास केल्यास त्यामधील नाटयात्मकता आपल्या लक्षात आल्या-

शिवाय रहात नाही.

अशाप्रकारे अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील संवादाचे स्वरूप दिसते. त्यांच्या संवादाची भाषासुध्दा ग्रामीण ढंगाची आणि वळणाची आहे. कारण अण्णाभाऊंचा प्रेक्षक हा ग्रामीण, खेडूत आहे. अज्ञानी आहे. त्याला साधे साधेच संवाद समजू शकतील ही दक्षता घेऊनच त्यांची लोकनाटये सजलेली दिसतात. लांबलचक किंवा क्लिष्ट अशा संवादाची रचना कुठेही आढळत नाही.

७. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील बतावणी :

तमाशा याप्रयोगरूप कलाप्रकारामध्ये " बतावणी " हा एक महत्वपूर्ण घटक समजला जातो " बतावणी" मध्ये एखादी छोटीशी विनोदी कथा असते. या छोटया विनोदी कथेमध्ये काही विषय समाविष्ट करून त्यांचा विस्तार केलेला असतो. पारंपरिक बतावणीमध्ये असे विषय समाविष्ट करून त्यांचा विस्तार केलेला असतो. पारंपरिक बतावणीमध्ये असे विषय साधारणपणे रंजक स्वरूपाचे असत. ख-याचे खोटे-खोटयाचे खरे करणे. अशा काल्पनिक विषयावर आधारित पारंपरिक बतावणीचे स्वरूप निश्चित झालेले दिसते. पारंपरिक बतावणीमध्ये " तात्या " आणि " बापू " ही दोन पात्रे ठरलेली दिसतात. बतावणीतील कोणतेही कथानक असले तरी हीच पात्रे त्या त्या बतावणीमध्ये आढळतात. तमाशात सादर होणा-या वगातील पात्रे रंगवून होईपर्यंतच्या वेळात या बतावणीचे सादरीकरण केले जाते. साधारणपणे अर्धा एक तासाचा हा कार्यक्रम असतो " या बतावणीला " फार्स " " रंगबाजी " " संपादणी" अशी ही नावे आढळतात. "[२०] असे विश्वनाथ शिंदे लिहितात.

अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामध्ये बतावणीचा वापर केला. त्यांची " बतावणी " पारंपरिक बतावणीप्रमाणे रंजक आहे. पण ती काल्पनिक विषयावर आधारलेली नाही. तर समाजातील

अनिष्ट घटना आणि प्रसंग यावर आपल्या बतावणीतून त्यांनी प्रकाश टाकलेला दिसतो. समाजामध्ये आढळून येणारी आर्थिक विषमता, जातीभेद, दैववाद, रुढीप्रियता आणि राजकीय नेत्यांची भ्रष्ट वृत्ती. यासारखे अनेक विषय बतावणीच्या रुपातून समाजमना-समोर उभे करुन त्यांना हास्यास्पद ठरविले आहे. त्यादृष्टीने खाप-या चोर" बिलंदर बुडवे" " पेंग्याचे लग्न " " अकलेची गोष्ट" " दुकाळात तेरावा " यासारखी लोकनाटये उल्लेखनिय आहेत. या लोकनाटयात अण्णाभाऊ साठे यांनी बतावणीचा कौशल्यपूर्ण वापर केला आहे. त्यांच्या " बिलंदर बुडवे " या लोकनाटयामध्ये " राणू " आणि " बाबुराव बुडवे " ही दोन प्रमुख पात्रे आहेत. " राणू" हा मराठमोळा शेतकरी जस्यास तसे वागणारा आहे. पण " बाबू " हा नावाप्रमाणे बुडवेगिरी करणारा आहे. यांची भेट एका आडरस्त्यावर होते. तेव्हा " राणू " " बाबू"ला विचारतो तुमचे आडनांव " बुडवे " म्हणजे काय भानगड आहे. यावर " बाबू " उत्तर देतो :-

बाबू - म्हजी आमच्या पूर्वजांनी लोकांची कर्जे काढली आणि ती बुडवली. तेव्हापासून लोक आम्हाला बुडवे म्हणू लागले.

राणू- आता तुम्ही धंदा तरी कोनता करता म्हणाव ?

बाबू - तोच ! कर्ज काढायचा व बुडवायचा ! वडलांचा....

राणू- होय, पर त्यो धंदा तरी चालतोय काय ?

बाबू - होय, अगदी सुतासारखा सरळ चालू हाय.

राणू- मला हे खरचं वाटंना.

बाबु - खरं का वाटत नाय ? हा बाबुराव बाजी बुडवे हया भागात फार प्रसिध्द व्यक्ती समजली जाते समजलात पाटील ?

राणू- हो ते खरं हाय पर एकादा कर्ज वसूल करणारा खमक्या भेटला तर, मग ?

बाबू - ते शाक्यच न्हाय पाटील, आजपर्यंत मला दिलेलं कर्ज कुणीही वसूल केलेलं नाय.

राणू - हेच मला पटना बघा.

बाबू - खात्री करुन घ्यायची हाय का त्याची ?

राणू - नव्हं, म्हटलं काळ बदललाय, शिवाय माणूस हुशार झालंय, नवं कायदं आल्यात.

बाबू - मंग ठीक हाय, दूर कशाला ? तूच दे मला कर्ज आणि कर वसूल पाहू

राणू - कबूल हाय मला। मी देतो कर्ज .[21]

अशारितीने " राणू " " बाबू"ला कर्ज देतो " राणू" वीस रुपयाचे कर्ज देतो. पण कागदमात्र एक हजार रुपयाचा करुन घेतो. एका वर्षानंतर " राणू " " बाबू"कडे कर्जवसूलीसाठी जातो. पण नेहमीप्रमाणे " बाबु" बुडवेगिरीची भाषा बोलू लागतो. तेव्हा " राणू" कर्जफिटूपर्यंत " बाबू"चा मरणाला टेकलेला म्हातारा कर्जाच्या मोबदल्यात नेतो. पण " बाबू " ठराव करतो की म्हातारा मेला तर एक लाख रुपये दंड भरावा लागेल. काही दिवसानंतर " राणू" म्हातारा मेला अशी अफवा पसरवतो. हे " बाबू"ला पटते तेव्हा आता आपल्याला एक लाख रुपये मिळणार या लालसेने " बाबू " राणू"कडे जातो. व " राणू"च्या कर्जाची परतफेड करतो. आणि आमचा म्हातारा आम्हाला द्या. नाहीतर एक लाख रुपये दंड भरा. असे " राणू" ला सुनावतो. तेव्हा राणू सांगतो राणू- ( नोटा हौसाच्या हाती देत) बुडवे महाराज, ओरडू नगा. ( हौसाला बाजूला ओढून) आणि हे पैस देऊ नगासा. ( आत जातो सर्व शांतपणे पाहतात राणूजी म्हाता--याला घेऊन येतो) हं घ्या, बघून घ्या, म्हाताराच हा बरं त्याचं भूत न्हवं हे ।

इसम - अरेरे, मेलेला म्हातारा कसा आणलास रे

राणू- तुमाश्नी काय करायचं ? आणला सरणातनं।

बाबू- ( शांत होऊन ) म्हंजी माझा म्हातारा मेला नव्हता का ?

राणू - ते इच्चार म्हाता-याला !

बाबू - मंग सकाळी नदीला जाळलंस ते काय !

हौसा - ते बी आपल्या बाला इच्चारा.

इसम - शेटजी, माझं एक हजार रुपये !

राणू - ते बी म्हाता-यापाशी

बाबू - अरे ते पैसे -

राणू - ते पैसे माझं कर्ज । आणि हयो तुमचा म्हातारा । -[२२]

वरील बतावणीतून अण्णाभाऊंनी तत्कालीन समाजव्यवस्थेतील फसवेगिरी करणा-या लोकांच्या वृत्तीवर प्रकाश टाकला आहे. " बाबू" ची बुडवेगिरीची भाषा आणि " राणू"चा मुत्सद्दीपणा यामधून अण्णाभाऊंनी तत्कालीन माणसांच्या विविध वृत्ती प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. तसेच तत्कालीन कायदा व न्यायदान व्यवस्थेची खिल्ली उडविलेली दिसते. " नव्हं म्हटल काळ बदललाय, शिवाय माणूस हुशार झालंय, नव कायदं आल्यात, " यासारख्या संवादातून अण्णाभाऊंनी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॅा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीचे वारे सर्वसामान्यांच्यामध्ये पसरले आहे.व त्यामधून सर्वसामान्यांच्यामध्ये नवजागृती कशी घडून आलेली आहे याची प्रचिन्ती येते.

" पेंग्याचे लग्न" या लोकनाटयातील " गावकर" हा आपल्या गावामध्ये आपले वर्चस्व असेच कायम रहावे.यासाठी तो नेहमी प्रयत्नशील आहे. पण " राणू" सारख्या नव्या पुरोगामी विचाराच्या कुणबी सेवा संघाच्या कार्यकत्याला हे पसंत नाही. " गावकर" पेंग्याचे लग्न " पुतळा" नावाच्या एका सुंदर गरीब मुलीशी लावण्याचा खटाटोप करतो. " पेंग्या" हा नावाप्रमाणेच विक्षिप्त स्वरूपाचा आहे. त्यामुळे तो " पुतळा" ला पसंत नाही. मात्र गावकर पेंग्याचे वडील " नारु ". यास म्हणतो की देज द्यायचे पण पेंग्याचे लग्न पुतळाशीच करायचे परंतु नव्या विचाराचा

" राणू " म्हणतो -

राणू - लग्नासाठी गरीबाला कर्ज काढाय लावता आणि तो नवरा पायकी करून मरतो. तुम्ही मजा करून मोकळे होता याचा विचार कधी करता का ? स्वार्थ पहाता.

गांवकर - ( चिडून ) खोटं आहे कुणाची आम्ही पै खात नाही ( पेंग्या हळूच प्रवेश करतो ) विचार या नारूमामाला, काय दिलं त्यानं आम्हाला ?

पेंग्या - ( मनगटाने नाक पुशीत ), न्हाय बर, काय बी दिलं, मातर पाच नोटा दिल्या. दहा दहाच्या

गावकर - ( मोठ्याने ) पेंग्याऽऽ

नारु - ( मोठ्याने ) पेंग्याऽऽ

पेंग्या - ( मटकन खाली बसतो ) अोऽऽ न्हाय

नारु - गाढवा, मधी बोलू नको.

गावकर - हा मुर्ख आहे. याला काडीची अक्कल नाही.

पेंग्या - हो गांवकराचं खरं

राणू - मग याच लग्न तुम्ही का करता ? बोला ?

गांवकर - तसा हा शहाणा आहे परंतु........

पेंग्या - हो मी का येडा हाय ? ( मनगटाने नाक पुसतो )

गांवकर - आणि अशा गरीबाचं लग्न होऊ नये का ?

राणू - करा की परंतु तुमच्यासारखीच नवरी पहा. मेंढराच्या गळयात माणिक बांधू नका. आणि एखाद्या गरीब बाईचा गळा कापू नका.

गांवकर - मंडळी हा आम्हाला कसाब म्हणतो आहे याचा अर्थ काय ? याला विचार !

राणू - याचा अर्थ जो आमच्या कुणबी सेवा संघाला मानीत नाही तो कसाब आहे.[२३]

याठिकाणी पुरोगामी विचाराचा प्रसार प्रस्तुत बतावणीतून केलेला दिसतो. हे अण्णाभाऊंच्या बतावणीचे वैशिष्ट्य आहे. पारंपरिक बतावणीमध्ये कल्पनारंजक घटना आणि पात्रे निवडून विनोद निर्मिती घडविलेली आहे. पण अण्णाभाऊंनी मात्र आपल्या बतावणीमध्ये वास्तव जीवनांतील अनेक ताजी बटबटीत पात्रे घेऊन व ती अतिशयोक्तपूर्ण घटना प्रसंगातून मांडून पात्रांच्या विक्षिप्त स्वरूपाच्या वर्तनातून विनोद निर्मिती केलेली दिसते. व ढोंगी आणि आपमतलबी वृत्तीच्या माणसावर आपल्या बतावणीतून अण्णाभाऊंनी कोरडे ओढलेले दिसते. अण्णाभाऊंनी केलेला हा बदल महत्वपूर्ण आहे. या संदर्भात वामन होवळ लिहितात" गणा, गळिणा, वगनाट्य ह्यात धाडसाने कलात्मक बदल घडवणारा अण्णाभाऊ हाच एकमेव बंडखोर व क्रांतीकारी शाहीर होऊन गेला."[२४]

अतिशयोक्तीचा वापर करून पात्रांच्या विक्षिप्त वर्तनाच्या आधारे पारंपरिक तमाशातील बतावणी रंगत असे, त्यामुळे बतावणीला रंजक स्वरूप प्राप्त होत असे. अण्णाभाऊ साठे यांनी मात्र त्यातील रंजनपरतेचा भाग कमी करून बतावणीच्या आधारे लोकांच्या मनावर बोध करण्याचा प्रयत्न केला. बोध करताना उपरोधात्मक विनोदाचा कौशल्यपूर्ण वापर करून अत्यंत परिणामकारक स्वरूपाचा आशय आपल्या लोकनाट्यातून मांडला. हा आशय मांडतांना बतावणीतून मूळची वैशिष्ट्ये अबाधित राखली आणि ह्या वैशिष्ट्याचा कलात्मक वापर केला.

## सारांश :

अण्णाभाऊंच्या लोकनाट्यातील आशयासंबंधीच्या या विविध घटकांचा किंवा वाङ्मयीन विशेषांचा विचार केल्यानंतर अण्णाभाऊंनी निर्माण केलेला लोकनाट्य हा प्रकार मुळातच प्रयोजनमुलक आणि प्रबोधनात्मक असा आहे.

अण्णाभाऊंची सर्वच लोकनाट्ये ही माणसाच्या जीवनाशी सुसंगत अशीच आहेत. वास्तवतेच्या किंवा कल्पनारम्यतेच्या आहारी कुठेही गेलेली दिसत नाहीत. आपले जीवन कंठीत असताना स्वत:च्या जीवनामध्ये व भोवतालच्या परिसरामध्ये घडलेल्या घटनांच्या अनुषंगानेच त्यांची [illegible] स्वत:चे असे स्वतंत्र [illegible] धारण करून.

अविष्कृत झालेली दिसतात. त्यामुळे लोकनाटयातील घटकांच्या बाबतीत स्वभावरेखाटन, संघर्ष, प्रसंगनिर्मिती, विनोद आणि संवाद यांचा विचार करता आपल्या व भोवतालच्या जीवनांतील अनेक कडू गोड अनुभवांची गुंफन करुनच कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती न करता त्यांची लोकनाटये सजलेली आहेत.

अखिल महाराष्ट्रातील किंबहुना देशातील अनेक राजकीय आणि सामाजिक जीवनांतील दांभिक गोष्टी लोकांच्यासमोर उघडया करुन, अशा गोष्टींचे विडंबन करुन त्या समाजमनाला पटवून दिलेल्या आहेत. अण्णाभाऊंचे अस्सल ग्रामीण भाषेतील अलंकारीपण, खटकेबाज संवाद, सहज विनोद आणि प्रासादिक कवने ही खेडयापाडयातील अज्ञ, अडाणी जनतेपासून ते मुंबईतील पांढरपेशा वर्गालाही वेड लावणारी आहेत. त्यामुळेच त्यांच्या लोकनाटयाला विलक्षण लोकप्रियता लाभलेली दिसते. मराठी मनाला रिझवील आणि प्रबोधनही घडवील अशा तंत्राचा वापर केल्यामुळे अण्णाभाऊंची लोकनाटये ही निश्चीतच जनतेला जिव्हाळयाची वाटतात.

## संदर्भटीपा


| | | |
|---|---|---|
| १. | आद्य, रंगाचार्य | भारतीय रंगभूमी, अनुवादक- रा. प्र. कानीटकर, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९७५, पृष्ठ- ८६. |
| २. | जोग, वि. स. | अस्मितादर्श, संपादक, गंगाधर पानतावने, १९७६, अंक-१, पृष्ठ-१४. |
| ३. | भोसले, सं. सा. (संपा.) | अण्णाभाऊ साठे,: अप्रकाशित वगनाट्ये, लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२- पृ. १. |
| ४. | तत्रैव, | पृष्ठ २. |
| ५. | तत्रैव, | प्रस्तावना. |
| ६. | कोतापल्ले, नागनाथ | तमाशा ते वगनाट्य, बळीराजा, ( ग्रामीण साहित्य विशेषांक) संपा. प्र. बा. भोसले, ऑक्टोबर ८४, पृष्ठ १४२. |
| ७. | क-हाडे, सदा | मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, लोकवाङ्मय गृह, मुंबई १९९७, आवृत्ती दुसरी, पुष्ठ १२२, |
| ८. | साठे, अण्णाभाऊ | नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ- १३-१४. |

९. तत्रैव, पृष्ठ, २८, २९.

१०. तत्रैव, पृष्ठ ४१.

११. तत्रैव, पृष्ठ ३६.

१२. ब्रम्हे, मो. द. मराठी नाटयतंत्र, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे शाके १८८६, पृ. १०५.

१३. पवार, गो. मा. विनोद एक वाङ्‌मय प्रकार, साहित्य अध्यापन आणि प्रकार, संपादक - श्री. पु. भागवत इत्यादी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७, पृष्ठ- ३३८.

१४. पाटील, बी. एम. कलंदर प्रेषित, प्रकाशक- गो. ह. चांदणे, कोल्हापूर, १९८१, पृ. १३.

१५. साठे, अण्णाभाऊ नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृ. ४७.

१६. पवार, गो. मा. विनोद एक वाङ्‌मय प्रकार : साहित्य अध्यापन आणि प्रकार, संपादक-श्री. पु. भागवत इत्यादी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७, पृष्ठ- ३३८.

१७. साठे, अण्णाभाऊ नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८० आवृत्ती दुसरी, पृ. ७१.

१८. जोग, वि. स. अस्मितादर्श, संपादक गंगाधर पानतावणे, १९७६, अंक-१, पृष्ठ-१५.

१९. साठे, अण्णाभाऊ नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ. २८.

२०. शिंदे, विश्वनाथ पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९४, पृष्ठ-९६.

२१. भोसले, सं. सा. (संपा.) अण्णाभाऊ साठे: अप्रकाशित वगनाट्ये, लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२, पृ. ८०-८१.

२२. तत्रैव, पृष्ठ ९०, ९१.

२३. तत्रैव, पृष्ठ, १७, १८.

२४. होवाळ, वामन मला भेटलेला शाहीर : अण्णाभाऊ अस्मितादर्श, संपादक-गंगाधर पानतावणे, १९८२, पृ. ९२.